# गोंडवानाविद्यापीठ, गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

---

जा.क्र. ००३/२०१६ दिनांक :२९/०८/२०१६

प्रति,
मा.प्राचार्य,
रासेयो पथक कार्यरत असलेले सर्वम हाविद्यालये,
चंद्रपूरजिल्हा.

विषय : 'आव्हान'—आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षणाकरिता जिल्हास्तरीय रासेयो निवडशिबीर.

महोदय,

वरील विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिल्ली येथे राष्ट्रीय व मुंबई येथे राज्य स्तरावरील प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी २०१७ च्या पथसंचलनासाठी स्वयंसेवक निवडीकरिता पुर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाते. पुर्व प्रजासत्ताक दिन पथ संचलन प्रशिक्षण शिबीरात सहभाग घेण्याकरिता संलग्नित महाविद्यालयांच्या रासेयो पथकातील स्वयंसेवकांमधून जिल्हास्तरावर शिबीर आयोजित करून निवडकरावयाची आहे. तसेच जून २०१७ मध्ये होणाऱ्या 'आव्हान'—आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी विद्यार्थ्यांची निवड याच शिबिरातून करण्यात येणार आहे.

उपरोक्त जिल्हास्तरीय निवड शिबीर सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथे दिनांक ७ सप्टेंबर २०१६ रोज बुधवारला सकाळी १०:०० वा. आयोजित करण्यात आले आहे.

या निवड शिबिरात सहभागी होण्यासाठी रासेयो कार्यपुस्तीकेत पृष्ठ क्र. १४ व १५ मध्ये नमुद केलेल्या नियम व अटी नुसार आपल्या महाविद्यालयातील ०२ रासेयोस्वयंसेवक व ०२ रासेयो स्वयंसेवीकेची महाविद्यालय स्तरावर निवड करून नियोजित स्थळी दिलेल्या वेळेवर सहभागी करून सहकार्य करावे ही विनंती.

टिप—१) पुर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षणाकरीता रासेयोचे दुसरे वर्ष अनिवार्य आहे.
२) आव्हान—२०१७ करीता रासेयोचे प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

—स्वा—
प्रा. डॉ. एन. एस. गिरडे
रासेयो जिल्हासमन्वयक, चंद्रपूर.

भ्रमणध्वनीक्र. ९४२३६७५८८१, ९४०४५७२५३२
ई—मेल : **girdenss@gmail.com**